■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१८ ■ मंगळवार दि.५ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 318 ■ Tuesday Dt. 5 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# तलवाडा गाव तलाव परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अतिक्रमणाचा सुळसुळाट; ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या सूचनेला ठोसा दाखवला!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## गटविकास अधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशालाही ग्रामविकास अधिकारी मुसळेंकडून केराची टोपली; मुसळेंच्या मनमानीने प्रशासन हतबल?

# काम करू नका म्हणणाऱ्या ग्रामविकास अधिकारी मुसळेंच्या आदेशावर माती; अतिक्रमणवाल्यांचे पुन्हा काम सुरू, मग डाळ कुठे शिजतेय?

## तलावाची जमीन गिळंकृत करण्याचा प्रयत्न; ग्रामविकास अधिकाऱ्यांना कोणीच भाव देत नाही?

**तलवाडा । प्रतिनिधी**

**तलवाडा गावातील तलाव परिसरात अलीकडच्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अतिक्रमण सुरू असून, ग्रामविकास अधिकारी श्री. मुसळे यांनी अतिक्रमण थांबवण्यासंदर्भात अधिकृत नोटीस देऊनही अवघ्या पंधरा दिवसांतच अतिक्रमण करणाऱ्यांनी कामाला पुन्हा सुरुवात केली आहे. ग्रामपंचायत कार्यालयाकडून दिलेल्या नोटीसीनंतरही ही कामे कोणाच्या आशीर्वादाने आणि पाठबळावर सुरू आहेत, हा प्रश्न ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. तलावाजवळ सुरू असलेली ही अतिक्रमणे केवळ पर्यावरणासाठी नाही तर सार्वजनिक जागेच्या हस्तांतरासाठी सुद्धा धोकादायक ठरत आहेत.**








डाळ कुठे बसून शिजतेय? असा सवाल आता गावकरी विचारू लागले आहेत. शासनाच्या आदेशाला धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या कामांमुळे प्रशासनाचा वचक राहिला आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गावकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली असून, जर या बेकायदेशीर अतिक्रमणावर वेळीच नियंत्रण आणले नाही, तर पुढे जाऊन गाव तलावाचा शाश्वत उपयोग धोक्यात येऊ शकतो.

गावातील ऐतिहासिक तलावाच्या सीमारेषेजवळ अलीकडे बेकायदेशीर अतिक्रमणांची लाट उसळली असून, ग्रामविकास अधिकारी मुसळे यांनी यापूर्वी स्पष्ट नोटीस देऊन काम थांबवण्याचा इशारा दिला होता. मात्र, त्या सूचनेला केराची टोपली दाखवत अतिक्रमणधारकांनी अवघ्या पंधरा दिवसांतच पुन्हा काम सुरू केले आहे. सार्वजनिक मालमत्तेवर सर्रासपणे अतिक्रमण करून बांधकामे सुरू आहेत. हे काम दिवसा ढवळ्या चालू असल्याने प्रशासनाला हे दिसत नाही की दुर्लक्ष केले जात आहे? असा सवाल नागरिक करत आहेत.

पान २ वर

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या निवेदनाची अवहेलना, मुसळे यांची गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली!

गाव तलाव परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणाच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर गटविकास अधिकारी यांनी तात्काळ पंचनामा करून कारवाईचे आदेश ग्रामविकास अधिकारी मुसळे यांना दिले. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी मुसळे यांनी त्याला केराची टोपली दाखवली, अशी तीव्र प्रतिक्रिया संघटनेकडून व्यक्त करण्यात येत आहे. अतिक्रमणासारख्या गंभीर विषयावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आदेश असतानाही कार्यवाही न करणे, ही थेट प्रशासनिक बेपर्वाई आणि अतिक्रमण करणाऱ्यांना अप्रत्यक्ष पाठीशी घालण्याचा प्रकार असल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपयुवा अध्यक्ष शेख खिजर म्हणाले की, तलाव परिसर हा सार्वजनिक मालमत्ता असून, त्याचे रक्षण करणे ही ग्रामविकास अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. पण येथेच जबाबदारी झटकली जात आहे. शासनाच्या आदेशाला जर अशा प्रकारे दुर्लक्ष केले जात असेल, तर मग सामान्य जनतेने कुणाकडे दाद मागायची? या प्रकरणी तालुका स्तरावरुन उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात येत असून, जर मुसळे यांच्यावर तत्काळ कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील शेख खिजर व जयदेव शिगणे यांनी दिला आहे.

# पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूल जप्त, एका आरोपीला अटक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पिंपळनेर पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्याला अटक केली आहे. किशोर रामभाऊ माटे (वय ३७, रा. लोणी, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि.०४.०८.२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पिंपळनेर ते लोणी फाटा रस्त्यावर ओमकार हॉटेलसमोर एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सपोनि घुगे यांनी तात्काळ पोलीस



उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण पो शी पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांच्यासोबत दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली.

हॉटेल ओमकारसमोर संशयित व्यक्ती उभा असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला पाठीमागील बाजूस एक अर्धवट गंजलेले लोखंडी गावठी पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. जप्त केलेल्या गावठी पिस्तूलाचे अंदाजित मूल्य ४०,०००/- रुपये आहे. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करून पिस्तूल जप्त केले आहे. आरोपीने बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल

पान २ वर

### जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; तीन दुचाकी व एक मोबाईल रोख रक्कम मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा दाखल

# पुन्हा एकदा अवैध जुगार अड्ड्यांवर वचक

**बीड । प्रतिनिधी**

शहरात अवैधपणे जुगार अड्डा चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या पोलीस प्रकरणाच्या पथकाने छापेमारी करत कारवाई केली आहे बीड शहरातील पेठ बीड परिसरात ठिकाणी सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांच्या पथकाने टाकलेल्या धाडीत एकूण तीन दुचाकी एक मोबाईल लाखो रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर कारवाईत ३ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धाडीत जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, मोबाईल व इतर साहित्याचा समावेश आहे. पोलिसांनी घटनास्थळी उपस्थित सर्व



जणांना अटक केली.

सविस्तर वृत्त असे की फिर्यादी अल्ताफ मोमीन शेख पोशि वय ३८ वर्षे व्यवसाय नोकरी पोलीस शिपाई ब.न १९६० पोलीस स्टेशन पेठबीड आरोपी १) परमेश्वर प्रल्हाद डोईफोडे वय ४५ वर्षे रा. जुना मोंढा, मन्सुर शहाद दर्गा बीड २) अमोल काशीनाथ साबळे वय ३८ वर्षे भिमनगर जुना मोंढा पेठबीड ३) सिकंदर शेख अहमद वय ३८ वर्षे शनि मंदिर गल्ली जुना मोंढा बीड व ईतरगु.घ.ता.वेळ ठिकाण--दिनांक ०३/०८/२०२५ रोजी फटाका मार्केट येथे विट भट्टीचे बाजुला स्मशानभुमी समोर पेठबीड मिळाला माल - जुगाराचे साहित्य, नगदी रक्कम व तिन दुचाकी व एक मोबाईल असा एकुण १९९६१० रुपयेचा मुद्देमाल खुलासावर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी स्वताचे फायद्यासाठी तिर्रट नावाचा जुगार गोल रिंगनात बसुन खेळताना व खेळवीत असताना तिन इसम जागीच मिळुन आले व इतर दोन ते तिन इसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले म्हणुन वरील कलमान्वये गुन्हा दाखलकरण्यात आला आहेपोलिसांच्या या तत्परतेमुळे शहरात पुन्हा एकदा अवैध जुगार अड्ड्यांवर वचक बसला आहे.

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने पुणे शहरातून केली पीडितेची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

पोस्टे शिरूर कासार गुन्हा रजिस्टर नंबर ७१/ २०२१ कलम ३६३, ३७० भादवी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. पीएसआय पल्लवी जाधव यांनी -कढण चा चार्ज घेतल्यावर सदर गुन्ह्याच्या मूळ फाईलचे, बारकाईने अवलोकन केले. त्यानंतर पीडित मुलीच्या मामा कडून गुन्ह्या संबंधाने माहिती मिळवली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. त्यावरून दिनांक ०२/०८/२०२५ रोजी सकाळी -कढण ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने पुणे साठी रवाना झाली. पुणे शहरात दोन दिवस टीम आरोपीचा शोध घेत होती, आरोपीचे लोकेशन सारखे बदलत होते. शेवटी दोन दिवसाच्या अथक प्रयत्ना नंतर धचघ सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अव्हाळवाडी रोड,



**पीएसआय पल्लवी जाधव व त्यांच्या AHTU टीमने केली कार्यवाही**

पान २ वर

## पहिल्याच दिवशी खुर्चीवर बसतात प्रभारी सपोनी राजेश गडवे यांची वाळू तस्करावर कारवाई

**चकलंबा पोलीस स्टेशन गुन्हा दाखल**
**तलवाडा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांबा पोलिस ठाणे प्रभारी सपोनि राजेश गडवे यांनी पहिल्याच दिवशी चकलांबा पोलिस ठाणे अंतर्गत उमापूर पोलिस चौकी हद्दीतील गुंतेगाव याठिकाणी वाळू तस्करावर कारवाई करून आठ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. चकलांबा पोलिसांनी केलेल्या या दबंग कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. गोदापात्रात केलेल्या या कारवाईत ७,९३००० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चकलांबा पोलिस ठाणे हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी हजर झाल्यानंतर पहिल्याच दिवशी वाळू तस्करांवर मोठी ८ लाखांचा मुद्देमाल जप्त करून केली दबंग कारवाई केली आहे. सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी गुंतेगाव येथे पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास गोदावरी नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार राजेश गडवे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना देऊन कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक तांगडे साहेब, पो.कॉ. चांदमारे, प्रशांत घोंगडे, हनुमान इंगोले, होमगार्ड सुरेश चव्हाण आदींनी मिळून छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर आढळून आले. यामध्ये एमएच-२३-बीएच-१३७० असे असलेले जुने ट्रॅक्टर ज्याची किंमत सात लाख रुपये व त्याला जोडलेली दोन टायर लोखंडी खंडी ट्रॉली किंमत्त नव्वद हजार रूपये आणि एक ब्रास वाळू जिची किंमत ३००० रुपये असा ७,९३००० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.




याप्रकरणी सुदर्शन गुलाबराव गोरडे (वय ४३ वर्षे) रा. गुंत्तेगाव ता. गेवराई यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हि कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजेश गडवे, पोलिस उपनिरीक्षक तांगडे, हनुमान इंगोले, चांदमारे, प्रशांत कल्याण घोंगडे, होमगार्ड सुरेश चव्हाण आदींनी केली आहे. चकलांबा पोलिसांनी केलेल्या या दबंग कारवाईचे गावकऱ्यांनी कौतुक केले असून वाळू तस्कराचे मात्र धाबे दणाणले आहेत.



## मोटरसायकल चोरास आणि जबरी चोरी करून लुटमार करणाऱ्या अशा दोन आरोपींना बीड शहर पोलीसांनी पकडले

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी मोटरसायकल चोरी आणि इतर चोऱ्यावर नियंत्रण करण्यासाठी सर्व ठाणेदार यांना सूचना दिल्या आहेत. बीड सरकारी दवाखाना येथील रुग्णालयासमोरून डॉक्टर दिनेश भगवान तुपे, आशापुरा अपार्टमेंट बीड यांची अवेंजर मोटरसायकल सरकारी रुग्णालय बीड येथून चोरी गेली होती. परंतु बीड शहर डीबी पथकाने यात चांगली कामगिरी करून यातील मोटरसायकल चोर पुन्हा एकदा सापळा लावून काही तासातच पकडला आहे. ज्या ठिकाणाहून गाडी चोरी गेली होती त्याच ठिकाणी डीपी पथकाने सापळा लावला होता आणि हात चोर तेथे गाडी चोरी करण्यासाठी काल दिनांक ४ ऑगस्ट २०२५ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास येथे आला आणि पोलिसांच्या सापळ्यात गाडी चोरी करत असताना अलगत अटकला.

पान २ वर

# शेत-जमीनीचे सर्व मुळ अभिलेखे ग्रामस्तरावरच उपलब्ध करावेत : राऊत

**शिरूर । प्रतिनिधी**

शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने विजय इंगळे नायब तहसिलदार शिरूर यांना अध्यक्ष शिवराम राऊत, उपाध्यक्ष माऊली शिंदे तसेच भीमराव सानप तंटामुक्ती समिती अध्यक्ष यांच्या वतीने निवेदन करण्यात आले. यामध्ये महसुली प्रशासनाने अनेक वर्षापासुन हिवरसिंगा सज्जा अंतर्गत हिवरसिंगा-औरंगपूर मलकाचीवाडी, मधील शेतकऱ्यांच्या जमीने मुळ दफ्तर हे तहसिल कार्यालय शिरूर का, येथे तलाठी यांच्या माध्यमातून जमा करून घेतलेले आहे. शासनाच्या ऑनलाईन सुविधेतून शेतकऱ्यांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्यासाठी जमा करून तब्बल सात-आठ वर्ष होऊन गेलेले आहे.



यामध्ये मुळ सात/बारा बुके, आठ अ दप्तर, मुळ सर्वे न.च्या नकला, खास्त्रा पत्रक, मुळ फेरफार रजिस्टरे, इतर नमुने यांचे स्कॅनिंग करून शेतकऱ्यांना सर्व कादपत्रा पैकी जरी एखादया मुळ कागदाची आवश्यकता असेल तेव्हा तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षात अर्ज करून जसा नंबर येईल तेव्हा तो उपलब्ध होतो. यामध्ये शेतकऱ्यांना किमान एक-दोनदा तहसिल कार्यालयात जाऊन वेळ व त्रास सहन करावा लागतो. ऑनलाईन सुविधा करण्यापूर्वी अनेक घटकांतील नमुन्या नोंदी बदल, नावे बदल, क्षेत्र दुरूस्ती करण्यासाठी मुळ सात बारा व आठ अ तसेच क्षेत्र दुरूस्ती व सर्च रिपोर्ट साठी सर्व जुने फेरफारची आवश्यकता असते. हिवरसिंगा मधील केवळ फेर न.२५९३ नंतरचे फेरच ऑनलाईन तलाठी कार्यालयातून मिळतात व त्या पूर्वीचे फेर मागणीसाठी तहसिल कार्यालयात खेटे मारावे लागतात. तसेच विद्यार्थी व नवनियुक्त शासकिय कर्मचारी यांना जातपडताळणी करण्यासाठी, कुणबी नोंदी शोधण्यासाठी सन १९६७ पूर्वीचा मुळ पुराव्यासाठी खास्त्रा पत्रक हे केवळ अभिलेखातूनच उपलब्ध करावे लागत असल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येत आहेत. करिता सर्व मुळ दप्तराचे स्कॅनिंग झाले आहे. ग्राम स्तरावर ऑनलाईन सातबारा व आठ अ प्रमाणेच इतर सर्व कागदपत्रे डिजिटल स्वरूपात प्राप्त होण्यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अनेक वर्षा पासुन तहसिल प्रशासनाला सज्जा अंतर्गत शेतकरी, विद्यार्थी यांचा वेळ व श्रम व पैसा बचत होण्यासाठी तलाठी यांच्या माध्यमातून ग्रामस्तरावर उपलब्ध करण्याची मागणीस ना.तहसिलदार यांनी या संबंधी जिल्हास्तरावरील वरिष्ठांना कळवून शेतकऱ्यांना सह्या होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले. या मागणी स्तव लवकरच जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन यासंबंधी निवेदन करून सर्व मुळ दफ्तर ग्रामस्तरावर उपलब्ध करण्याची मागणी करण्याचे अध्यक्ष शिवराम राऊत यांनी उपस्थित शेतकरी यांच्या वतीने निश्चित केले.

## अनुसूचीत जाती आयोग तक्रार प्रकरणी शेख मंजूर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन





**बीड । प्रतिनिधी**

बनावट दस्तऐवज तयार करुन फसवणूक केल्याप्रकरणी अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती. आयोगाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले तरी गुन्हा दाखल न केल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे आंदोलन करण्यात आले. माजलगाव येथील माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी खोटे दस्तऐवज तयार करुन फसवणूक केली. याप्रकरणी अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती.
या तक्रारीची दखल घेऊन आयोगाने चौकशी करुन ३० दिवसात गुन्हा दाखल करुन त्याचा अहवाल पाठविण्याचे आदेश दिले होते. पण स्थानिक पोलिसांनी आरोपीशी संगणमत करुन फौजदारी अमरण उपोषण गुन्हा अद्याप दाखल केला नाही. याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी काही नागरीकांनी आज आयोगाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी बीड पोलीस अधीक्षक कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले. यामुळे या आंदोलनाची दखल घेऊन पोलीस अधीक्षक संबंधितांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणार का? याकडे लक्ष लागले आहे.

## आराधना महोत्सवाचे आयोजन; विविध धार्मिक कार्यक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ स्वामी महाराजांच्या आज्ञा व अनुग्रहाने श्री अनंत श्री भक्तकामकल्पद्रुम श्री राघवेंद्र तीर्थ श्रीपादांचा ३५४ वा आराधना महोत्सव दि. १०,११,१२ ऑगस्ट २०२५ (रविवार, सोमवार व मंगळवार) या तीन दिवसीय साजरा करण्याचे आयोजन केले आहे.



रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५ स. ६:०० ते ११:०० : प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा स. ११:०० ते १२:०० : ज्ञानसत्र : पं. गोपीनाथाचार्य तुळजापूरकर (प्रवचन) दु. १२:०० वा. : महामंगलारती दु. ४:०० ते ५:०० : सेवा भजनी मंडळ, खडकपूरा भजन सेवा दु. ५:०० ते ७:०० : ह.भ.प. अंबादास महाराज चिक्षे यांचे किर्तन सायं. ७:०० ते ८:०० भजन, पालवी, आरती, पाळणा दि. ११ ऑगस्ट स. ६:०० ते ११:०० : प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा दु. १२:०० वा. वै. पं. वामनाचार्य जोशी स्मृती पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार विजेते वे.शा.सं.सूर्यकांत देविदासबुवा लिंबेकर यांना प्रदान करण्यात येणार असून रा.ज.संदीकर स्मृती पुरस्कार शिवाजी राघवेंद्र देशपांडे यांना प्रदान केला जाणार आहे.
दु. १२:३० वा. महामंगलारती दु. १:०० ते ३:०० : महाप्रसाद भजन, पालखी, आरती, पाळणा सायं. ६:०० ते ८:०० मंगळवार, दि.१२ ऑगस्ट २०२५ स. ६:०० ते ११:००: प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा स. ११:०० ते १२:०० : ज्ञानसत्र दु. १२:०० वा. महामंगलारती दु. ५:०० ते ७:०० ह.भ.प.श्री श्रीरामबुवा प्र. रामदासी (बिटरगांवकर) यांचे किर्तन सायं. ६:०० ते ८:०० भजन, पालखी, आरती, पाळणा आदी धार्मिक कार्यक्रम शहराच्या अनुराग वसाहतीतील उत्तरादि मठ येथे होणार असून या सर्व धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मिलिंद कऱ्हाडे, भक्त मंडळ उत्तरादि मठ, राघवेंद्र स्वामी सेवा मंडळ यांनी केले आहे.

## अजितदादा तुती लागवड ही वृक्षलागवड अंतर्गत येते का?

### ३ वर्षांनंतर तोडण्यासाठी शेतकऱ्यांना वेगळी परवानगी घ्यावी लागणार का? वृक्षतोड अंतर्गत गुन्हे दाखल तर होणार नाही ना? मुख्यमंत्री, प्रधान सचिव उपमुख्यमंत्री यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत हरित बीड या संकल्पने दरम्यान दि.०७ गुरुवार उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात येणार असुन या विक्रमाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस असुन दरम्यान नरेगाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या तुती लागवड (रेशीम विकास) तब्बल ७ लाख तुती लागवड या अनुषंगाने वृक्ष लागवड सदरात तुती लागवड येते का? तसेच ३ वर्षांनंतर शेतकऱ्यांना तुतीच्या लावलेल्या वृक्षाची तोडण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागेल का या विषयी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मार्गदर्शक सुचना करण्यात याव्यात. कारण तुती वृक्ष गृहीत धरला तर तोडणारांवर शासन नियमानुसार गुन्हे दाखल होणार त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदनाद्वारे विचारणा केली आहे.



हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत हरित बीड ही संकल्पना घेऊन एकाच दिवशी ३० लाख वृक्ष लागवड करण्याचा संकल्प बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी जाहीर केला आहे. बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या वृक्ष लागवडीचा शुभारंभ परवा दि.०७ वार गुरूवार रोजी करण्यात येणार आहे. आणि एकाच दिवशी ३० लाख झाडे लावत देश पातळीवरचा विक्रम नोंदविण्याचा मनोदय जिल्हाधिकाऱ्यांनी बोलून दाखवला आहे. आणि हे ३० लाखांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी तब्बल ७ लाख तसेच वृक्ष लावले जाणार आहेत. या विक्रमाची नोंद इंडियन बुक ऑफ रेकॉर्डस मध्ये व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचा मनोदय व्यक्त करत मागच्या दोन महिन्यांपासून बीडचे जिल्हा प्रशासन काम करत असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी पत्रकार परिषद सांगितले. या मोहिमेची सुरुवात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार असून अजित पवार बीडच्या खंडेश्वरी मंदिर परिसरातील मैदानात वृक्ष लागवड करणार आहेत.
विशेष म्हणजे एकाच दिवशी ३० लाख वृक्ष लागवडीचे अवघड आव्हान पेलण्यासाठी नरेगाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या तुती लागवड (रेशीम विकास) योजनेतून एकाच दिवशी जिल्ह्यात तुतीचे तब्बल ०७ लाख वृक्ष लावण्याचा विचार जिल्हा प्रशासन राबविणार असल्याची माहिती देखील जिल्हाधिकारी दिली. त्यामुळे तुती लागवड ही वृक्ष लागवड सदरात मोडते का?? तसेच तुती वृक्षलागवड केलेल्या शेतकऱ्यांना ३ वर्षांनंतर तुती लागवड केलेल्या झाडांची कापणी,तोडणी करण्यासाठी शासनाकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे का. तसेच तुती वृक्ष म्हणून गणना केली तर तोडल्यास शासकीय नियमानुसार गुन्हे दाखल होणार का??याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात यावे. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सुचना देण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## बीड जिल्ह्यासाठी पावसाचा अलर्ट; ६ ते ८ ऑगस्ट दरम्यान मुसळधार सरींचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**



राज्यात सक्रिय होत असलेल्या मोसमी पावसाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यालाही हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. ६, ७ आणि ८ ऑगस्ट या सलग तीन दिवस बीड जिल्ह्यात हलक्यापासून मध्यम ते काही ठिकाणी जोरदार सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
६ ऑगस्ट रोजी बीडसह परभणी, लातूर, हिंगोली, धाराशिव, सोलापूर आदी मराठवाड्यातील जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. ७ ऑगस्ट रोजीही बीड जिल्ह्यात पाउस बरसणार असून पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातही पावसाचा जोर वाढणार आहे. ८ ऑगस्ट रोजी बीडसह नगर, सोलापूर, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र, आगामी पावसामुळे खरीप हंगामाला चालना मिळण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून नागरिकांनी नद्या-नाल्यांच्या प्रवाहाजवळ न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महामानवाचा अवमान करणाऱ्या माथेफिरू समाजकंटकावर कठोर कारवाई करण्यात यावी : विनोदभाऊ थोरात

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे धोंडराई या ठिकाणी लोकशाहीर साहित्य सम्राट डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बॅनर लावण्यात आले होते. दि.३ ऑग्स्ट रोजी रात्रि काही माथेफिरु जातीवादी गावगुंड समाजकंटकांनी जंयतीच्या निमित्ताने लावलेले बैनर मधील महामानव परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि हजरत टिपू सुलतान यांचे फोटो फाडले.
यामुळे दोन समाजामध्ये वाद लावण्यचे काम मनुवादी प्रवत्ति करत असून सदरील घटनेची पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन माथेफिरु गांवगुंड यांच्यावर कारवाई करण्यात यावी व सामाजिक



सलोखा अबाधित ठेवण्यासाठी सहकार्य करावे या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने पोलिस निरीक्षक गेवराई यांना निवेदन देण्यात आले. कठोरात कठोर कारवाई माथेफिरूवर करण्यात यावी यासाठी लहुजी शक्ती सेनेचे मराठवाडा संघटक विनोदभाऊ थोरात यांनी केली आहे. यावेळी लहुजी शक्ति सेनेचे युवक तालुका अध्यक्ष अजय कापसे, युवा नेते गणेश कापसे युवा नेते शुभम खरात उपस्थित होते.

## महिलांनी सामाजिक न्यायाच्या आरक्षण वर्गीकरण लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवावा

**जालना । प्रतिनिधी**

अण्णा भाऊंच्या साहित्यातील महिला स्वतःच्या हक्कांसाठी लढणाऱ्या आणि संघर्ष करणाऱ्या आहेत. महिलांनी सामाजिक न्यायाच्या आरक्षण वर्गीकरण लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे प्रतिपादन सरस्वती फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता रनबावळे यांनी केले. परतूर येथील सरस्वती फाउंडेशनच्या कार्यालयात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी जयंती उत्सवाचे औचित्य साधत आरक्षण वर्गीकरण समतेचा जागर याविषयी सरस्वती फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता रनबावळे बोलत होत्या.
पुढे बोलतांना श्रीमती सुनीता रनबावळे म्हंटल्या की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने देशातील अनुसूचित जाती आरक्षणा अंतर्गत आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्या संदर्भात ऐतिहासिक निकाल दिला आहे. आरक्षण वर्गीकरण स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांना पूर्ण करणारे असल्याने ज्या वंचित जातीतील कुटुंबांना पिढ्यानपिढ्या आरक्षणाचा एकदाही लाभ मिळाला नाही आशा अतीवंचित जातीतील शेवटच्या घटकाला आरक्षणाचा सामाजिक न्याय आणि समतेची समान संधी मिळणार आहे, असे मत यावेळी श्रीमती सुनीता रनबावळे यांनी व्यक्त केले.
याप्रसंगी श्रीमती पारुबाई गजभारे, संगीता सूर्यवंशी, सत्यभामा जोगदंड, विद्या रनबावळे, छाया गजभारे, प्रायगबाई सूर्यवंशी, सुमित्रा नाटकर, प्रतीक्षा वाकुडे, आरती गजभारे यांची उपस्थिती होती.

## श्री क्षेत्र चाकरवाडी महाराष्ट्रातच काय जगभरात पोहचली आहे : नाना महाराज कदम

**बीड । प्रतिनिधी**

चाकरवाडी येथील ग्रामस्थांच्या पूर्वजांनी पुण्य केले आहे त्यामुळे दादा चाकरवाडी मध्ये आले आहेत. दादा श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आल्यापासून अखंड अन्नदान सेवा चाकरवाडी मध्ये सुरू आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह पार पडला यामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने भावी भक्तांनी महाप्रसाद घेतला. यावेळी चाकरवाडी ही महाराष्ट्रातच काय तर जगभरामध्ये पोहोचली आहे. जगभरातून आता दादा माऊलींच्या दर्शनासाठी भाविक भक्त चाकरवाडी या ठिकाणी येतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बाळनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे तपोनिधी शांतीब्रह्मा ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा झी टॉकीज फेम ह.भ.प. नाना महाराज कदम यांची संपन्न झाली.



महाराजांनी जगद्गुरु संत श्री तुकोबाराय यांच्या सुंदरते ध्यान उभे विटेवरी या अभंगावर ती चिंतन केले. महाराजांनी चिंतन करत असताना जगाचा मालक पांडुरंग परमात्मा किती सुंदर आहे सांगितले. अतिशय सुंदर असे विठ्ठलाचे ध्यान, कमरेवर हात ठेऊन विटेवर उभे आहे. त्याच्या गळ्यात तुळशीचा हार आहे पीतांबर नसलेला आहे असे हे विठ्ठालाचे रूप मला नेहमीच आवडते. मसोळीच्या आकारची कुंडले त्याच्या कानात झळकत आहेत गळ्यात कौस्तुभमणी धारण केलेला आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, हे ध्यान माझे सर्वसुख आहे असे सुशोभित ध्यान मी नेहमी आवडिने पाहीन. देवाकडे जा देव तुम्हाला मुक्त केल्या शिवाय राहणार नाही देवाकडे तुम्ही कोणत्या पण रूपात गेलात तर देवाला सगळे सारखेच असतात त्यासाठी देव तुम्हांला मुक्त केल्या शिवाय राहत नाही, असे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना मंत्रमुग्ध केले.
विठ्ठल कोणाला म्हणावे, सुंदर कोणाला म्हणावे, आपले कोण आहे, देवाकडे का पाहावे, देवाकडे का जावे महाराजांनी सांगताना सांगितले की या जगामध्ये देवा शिवाय आपले कोणाच नाही. मानवाला सौंदर्य देणारा तो देव आहे, प्रत्येक मानवाला जे सौदर्य दिले आहे ते भगवान परमात्म्याने दिलेले आहे. देवापुढे कोणालाच माफ केलं जात नाही. आपले भविष्य पाहण्यासाठी कोणाकडे हात दाखवू नका आपले भविष्य चांगलेच आहे आपला वर्तमान चांगला आहे तर भविष्य चांगलेच आहे ज्याचे अंतःकरण स्वच्छ आहे, सुंदर आहे त्याला तुम्ही सुंदर म्हणा. आपले सौंदर्य हे कधी तरी संपणारे आहे देवाचे सौंदर्य एवढे भारी आहे की देवाचे सौंदर्य हे कधीही संपणारे नाही ते आनंदमय आहे. देवाच्या सौंदर्याकडे जर पाहील तर आनंद होतो. देव तुमच अंतःकरण पाहिल्याशिवाय राहणार नाही. महाराजांनी अभंगामधून भाविकांना अनेक संदेश देत आपली सेवा संपन्न केली.
यावेळी गायनाचार्य सतीश महाराज जाधव, महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज, माखले महाराज मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, म्हणजे पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून...

### काम करू नका म्हणणाऱ्या ग्रामविकास अधिकारी मुसळेंच्या आदेशावर

ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेली नोटीस केवळ कागदावरच राहिल्याची चर्चा असून, यामागे स्थानिक राजकीय हस्तक्षेप असल्याचेही बोलले जात आहे. तलाव परिसर हे गावाच्या पाणी व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, या परिसरातील अतिक्रमण भविष्यात पर्यावरणीय आणि सामाजिक समस्यांना आमंत्रण ठरू शकते. सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदन देऊन या अतिक्रमणावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

### पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूल जप्त

बाळगून लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम २२३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.
सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण, पो शि पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांनी केली आहे.

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने पुणे शहरातून

वाघोली येथे आरोपी मिळून आला. त्याला ताब्यात घेवून पीडितेबाबत चौकशी केली असता, त्याने पीडिता ही गणेश नगर, अव्हाळवाडी रोड, वाघोली ता. हवेली जि. पुणे येथे असल्याचे सांगितले. त्यावरून तेथे जावून तिला ताब्यात घेतले. नंतर दोघांना सोबत घेवून सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे शिरूर कासार येथे हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

### मोटरसायकल चोरास आणि जबरी चोरी करून लुटमार करणाऱ्या

त्यास जागीच पकडण्यात आले आहे आणि त्याने काल चोरी करण्यात आलेली गाडी याची सुद्धा कबुली दिली आणि हॉटेल स्वराज समोर लावलेली डॉक्टर दिनेश तुपे यांची अवेंजर गाडी पोलिसांनी जाऊन ताब्यात घेतली आहे.
अभिलेखावरील गुन्हेगार वैभव संजय वराट राहणार आयटीआय कॉलनी बीड याने दि.२.८.२५ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास बंजारा हॉटेल समोर भैय्यासाहेब नागनाथ सोनकांबळे राहणार सम्राट चौक बीड. याचा मोबाईल आणि बाराशे रुपये नदी असे पैसे असे जबरीने काढून घेतले. परंतु बीड शहर च्या डीपी पथकाने चांगली कामगिरी करत प्रमुख आरोपी वैभव वराट याला तात्काळ अटक केली आहे त्याच्याकडून १२०० रुपये जप्त देखील केले आहेत. वैभव वराट याद दोन दिवस पीसीआर ची मागणी करण्यात आली आहे. यातील एक आणखी आरोपी अटक करणे बाकी आहे.
या दोन्ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, शहेंशा सय्यद, संदीप आघाव, अमर घुगे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशील उगले यांनी केली आहे. दोन्ही कारवाईबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# धोंडराईत महामानवाच्या फोटोची विटंबना!

## अज्ञात आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी

**गेवराई (प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे धोंडराई या गावात अज्ञात व्यक्तीने दोन महापुरुषाच्या फोटोची विटंबना केल्याची घटना दि. ४ ऑगस्ट सोमवार रोजी समोर आली आहे. ही घटना अत्यंत निंदनीय असून, या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा सर्व स्तरातून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. गेवराई पोलीस स्टेशन येथील पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेतली असून, अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या घटनेनंतर, विविध राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. त्यांनी या घटनेचा तपास करून, दोषी व्यक्तीला कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे. धोंडराई येथील साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या बॅनर वरील विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हजरत शेर टिपू सुलतान यांचा फोटो अज्ञात व्यक्तीने फाडल्याने महामानवाच्या फोटोची विटंबना झाल्याचे दिसून






येताच अज्ञात व्यक्तीने एका सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या महापुरुषाच्या फोटोची विटंबना केली. ही बाब स्थानिक नागरिकांनी पाहिल्यानंतर, त्यांनी पोलिसांना माहिती दिली. मौजे धोंडराई गावात काही अज्ञात समाजकंटकांनी डॉ.बाबासाहेबांच्या फोटो फाडल्याने दलित व मुस्लीम समाजात रोष निर्माण झाला आहे. तर या घटनेमुळे सर्वच स्तरातून संताप व्यक्त होत आहे.

धोंडराई गावाच्या बस स्टँडच्या भागात घडलेल्या या घटनेमुळे अनेकांच्या मनात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मदिनानिमित्त त्या ठिकाणी बॅनर लावण्यात आले होता मात्र काही समाजकंटकाने महामानवाचा फोटो कट करून फाडण्यात आला त्यामुळेही अनेक मुस्लिम समाज व भीमसैनिकांच्या भावना दुखावल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांच्या महाराष्ट्रात ग्रामीण भागाच्या ठिकाणी फोटोची विटंबना करणाचा प्रकार चिंतानजक व मान शरमेने खाली घालण्यास लावणारा आहे. अशा विकृतीला शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजेच असे भावना नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हजरत शेर टिपू सुलतान यांच्या फोटोची विटंबना करण्याचे धाडस होतेच कसे? असा संतप्त सवाल करून महामानवाच्या विटंबना करणाऱ्यांच्या मुसक्या आवळून त्यांना कठोर शासन करा, अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

या झालेल्या विटंबनेची पोलिस प्रशासनाने गंभीर दखल घेतलेली आहे. घटनेतील गुन्हेगार व त्यामागे असणार्याचा पर्दाफाश केला जाईल. सर्वांनी शांतता पाळावी, असे पोलीस प्रशासनाकडून आवाहन केले आहे. यावेळी या घटनेच्या निषेधार्थ लेखी निवेदन सादर करण्यासाठी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बॅनर वरील बाबासाहेबांची प्रतिमा असलेला फोटो फाडला : किशोर कांडेकर

विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेबांची प्रतिमा असलेला फोटो बॅनर वरील फाडल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ने आक्रमक पवित्रा घेण्यात आलायं झालेली घटना दुर्दैवीच असून आरोपी हा मतिमंद माणूस होता समाज समाजात दुही निर्माण करण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### समाजात तेढ निर्माण कराल तर याद राखा : शितल साखरे

मौजे धोंडराई गावात सर्व धर्म व जातीचे ग्रामस्थ एकोप्याने राहत आहेत. पण गावातील काही समाजकंटकांच्या माध्यमातून समाजात अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजात कोणी तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा सरपंच शितल अशोक साखरे यांनी दिला.



# १३ ऑगस्ट रोजी कृषिकुल येथे संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमाचे आयोजन

## ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांचीही उपस्थिती

**सिरसाळा/परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात परळी तालुक्यात व सिरसाळा परिसरातील शेतकरी यांना उत्पादनात वाढ करण्यासाठी एकमेव ग्लोबल विकास ट्रस्ट सिरसाळा येथे विकासपुरुष आणि सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टची स्थापना करून या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. आजमितीस ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल संस्थांच्या माध्यमातून राज्यभर आणि राज्याच्या बाहेर अनेक सामाजिक कामे केली जात आहेत. या सर्व गोष्टींच्या अनुषंगाने संवाद माध्यम प्रतिनिधींशी या विशेष कार्यक्रमांचे बुधवार, दि.१३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास मयंक गांधी यांची उपस्थिती असणार असून, बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी केंद्रस्थानी ठेवत विविध कामे राज्यभर आणि राज्याच्या बाहेरही केली जात आहेत. ज्यामध्ये जलसंधारण, मृदा संधारण, शेतीचे आधुनिकीकरण आणि शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संस्थेच्या माध्यमातून घेतले जातात. राज्याच्या विविध भागांतील शेतकरी शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे इथे घेऊन शाश्वत शेतीकडे वळले आहेत. सिरसाळा जवळ उभारलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या संकुल परिसरात विविध प्रयोगशाळा, प्रत्यक्ष फळबाग प्लॉट्स, गोशाळा तसेच शेतकरी प्रशिक्षण केंद्र उभे करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक मयंक गांधी या सर्व विषयाच्या अनुषंगाने सर्व पत्रकार, संपादक तसेच मध्यम प्रतिनिधी बांधवांशी संवाद साधणार आहेत. यानुषंगाने बुधवार, दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी १२ वाजता संवाद माध्यम प्रतिनिधींशी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. निमंत्रित सर्वांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त हनुमान विद्यालय घाटा पिंपरी येथे मुलींच्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करताना दैनिक आरंभचे आष्टी तालुका प्रतिनिधी सुरेश कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य तरटे सर, राऊत सर, वायबसे सर, गोरे सर, तांदळे सर, पवार सर, कनेरकर सर, धोंडे सर, घाडगे सर, वायबसे सर, तळेकर सेवक, घोडके सेवक, जाधव सेवक आदी मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्र : सुरेश कांबळे आष्टी)



नितीन महुवाले यांचे वडील कै. भारत जानकीराम महुवाले यांना महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना बीड यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. शासकीय विश्रामगृह बीड या वेळेस जिल्ह्यातील जिल्हा अध्यक्ष राहूल उंडाळे, माजी जिल्हा अध्यक्ष विष्णू आडे, सर्व तालुका अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य आदी उपस्थित होते.

# बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथे दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थी संसदनिवडणूक मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विविध खात्यांसाठी मंत्री निवड करण्यात आले.



यानिवडणुकीत विद्यार्थी प्रतिनिधी प्रतीक महादेव पौळ वर्ग १३ वी विज्ञान आणि संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी अ, आरोग्य मंत्री राधिका किरण बोरगे वर्ग नववी ब, अक्षरा गुणवंत गायकवाड वर्ग नववी अ, स्वच्छता मंत्री काकडे तेजस्विनी शुकलेश्वर काकडे वर्ग आठवी ब, क्रीडा मंत्री आर्यन विठ्ठल काकडे वर्ग आठवी ब, संगमेश्वर मारुती शिंदे वर्ग नववी ब, शालेय शिस्त मंत्री हर्षवर्धन श्रीपाद गोरे वर्ग सातवी अ अधिराज ज्ञानेश्वर रोकडे वर्ग सातवी अ, वृक्षारोपण मंत्री गणेश सतीश पौळ वर्ग बारावी कला, प्रतीक महादेव पौळ वर्ग बारावी विज्ञान, सांस्कृतिक मंत्री श्रद्धा अनिल जोगदंड वर्ग आठवी अ, राधा गणेश करंजकर वर्ग बारावी विज्ञान आणि विद्या मंत्री अक्षरा अमोल गोरे वर्ग दहावी अ, संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी अ अशी विविध पदे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात आली. सर्व पदाधिकारी विद्यार्थ्यांची निवड निवडणूक प्रक्रियेद्वारे करण्यात आली. या उपक्रमात मुख्याध्यापक सौ. सिंधुताई चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख संतोष रोकडे व शिवाजी मांदळे यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला आहे.

# युवासेनेतर्फे मोफत छत्रीचे वाटप; बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने यशस्वी उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, युवासेना मार्गदर्शक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने इमामपूर येथे मोफत छत्री वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांना पावसाळ्यात उपयोगी ठरणाऱ्या छत्र्यांचे मोफत वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या गरजा ओळखून, सामाजिक भान जपत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. गावकऱ्यांनी या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून स्वागत केले आणि युवासेनेचे आणि बाजीराव दादा चव्हाण यांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमास गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी यूवासेनेचे प्रमुख पदाधिकारी, तसेच धर्मवीर प्रतिष्ठानचे सर्व सहकारी, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक शिक्षकवृंद, पालक, व वरिष्ठ अनेक मान्यवर उपस्थित होते.



# रेंटोकील कंपनी व ग्रामऊर्जा फाउंडेशन यांच्या माध्यमातून करिअर मार्गदशन कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

रेन्टोकिल पी सी आय पेस्ट कंट्रोल, पुणे व ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेन्ट फाउंडेशन यांच्या माध्यमातून योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई व कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथे करिअर मार्गदर्शन व मानसिक आरोग्य या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.



या कार्यशाळेमध्ये करिअर च्या असणाऱ्या विविध संधी या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले, तसेच या संधी साठी लागणारे कौशल्य या विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले, यात आपला उत कसा असला पाहिजे, त्यात काय असायला पाहिजे काय सुधारणा करायला पाहिजे यावर चर्चा झाली, तसेच ज्या कंपनी मध्ये आपण जॉब ला जात आहोत त्या कंपनी ची काय काय माहिती व आभ्यास केला पाहिजे यावर मार्गदर्शन करण्यात आले. सध्या कामाचा आणि वैयक्तिक जीवनातला ताण, अभ्यासाचा ताण किंवा इतर वेवेगळ्या प्रकारचा ताण यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारा परिणाम या विषयी चर्चा झाली तसेच हा ताण कमी करण्यासाठी विविध कल्पना, खेळ, मंडला आर्ट सारख्या गोष्टी या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचा उद्देश ग्रामीण भागातील युवकांना जॉब च्या संधी बद्दल माहिती देणे व त्यासाठी त्यांची प्राथमिक तयारी करून घेणे हा होता. या कार्यशाळेसाठी रेन्टोकिल पी सी आय पेस्ट कंट्रोल कंपनीचे मार्गदर्शक म्हणुन श्री बीदान हालदार, गणेश गोडगे, सुरेश खोत, आदित्य जोशी व ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेन्ट चे दादासाहेब गायकवाड हे होते. तसेच योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री कानेटकर सर व कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री बंडेवाढ सर हे उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी

**केज । प्रतिनिधी**

दि.०३ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करूनअभिवादन केले. क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बहे या गावी आजोळी दि.०३ ऑगस्ट १९०० रोजी झाला. त्यांचे मुळ गाव येडे मच्छिंद्र आहे. वडिलांचे नाव रामचंद्र पाटील व आईचे नाव लक्ष्मीबाई होते. ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते. त्यांनी अंधश्रद्धा, हुंडा पद्धत या अनिष्ट प्रथा, चालीरीती बाबत जनजागृती केली ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटीस आव्हान देऊन क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. जबरीने सारा वसूल करणारास पायावर काठीने मारत व पत्रेही ठोकण्यात येत. त्यांची ग्रामराज्य स्थापन करण्याची कल्पना होती. ते काँग्रेस पक्ष सोडून कम्युनिस्ट पक्षात जाऊन दोन वेळा लोकसभेवर निवडून आले व खासदार झाले. ते बीड लोकसभा मतदार संघात १९६७ मध्ये निवडुन आले. त्यांना प्रती सरकार किंवा पत्री सरकार म्हणुन ओळखले जात असत. असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी सविस्तर माहिती दिली. श्रीमती गिताताई जीवराज अंडील, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर, ट्रेनी शिक्षिका सीमा सुधीर मोहिते, शिक्षक भारत बाबुराव हांगे, बाबासाहेब राजाराम मैंद यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन इयत्ता ०७ वी ची श्वेता सुहास सरवदे यांनी केले. आभार भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते यांनी मानले व कार्यक्रम संपन्न झाला.



## धानोरा रोड आणि अंकुशनगर भागात पडलेल्या मोठ्या खड्ड्याचे नामकरण अजित पवार खड्डा असे करण्याचा निर्णय

# ७ ऑगस्ट रोजी नामकरण सोहळ्यास वेळ न दिल्यास काळे झेंडे दाखवणार : सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील आहेर धानोरा रोड (पालवण चौक ते जुना बिंदुसरा डॅम) या ३० मीटर रुंदीच्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, गेल्या पंधरा वर्षांपासून या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम झालेले नाही. परिणामी मोठमोठे खड्डे, अपघात, धुळीचा त्रास, आणि वाहतुकीचा खोळंबा यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी बीड (पश्चिम) च्या वतीने पुढे चला आंदोलन, खड्डा नामकरण सोहळा आणि होडी चलाव आंदोलन आयोजित करण्यात आले. यामध्ये खड्ड्यांना राजकीय नेत्यांची नावे देत निषेध व्यक्त करण्यात आला.

विशेष म्हणजे, संबंधित प्रकरण उच्च न्यायालयात असून देखील, जनहित याचिकेत जोपर्यंत मावेजा मिळत नाही तोपर्यंत रस्त्याचे काम करू नये असा कुठलाही स्पष्ट उल्लेख नसतानाही, नगरपरिषद, जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक न्यायालयीन प्रकरणाचे कारण सांगत काम सुरू करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या आंदोलनात खड्ड्यांना नाव देण्याचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. त्यानुसार: एका खड्ड्याला खासदार बजरंग बप्पा सोनवणे खड्डा, दुसऱ्याला आमदार संदीप क्षीरसागर खड्डा तर तिसऱ्याला मुख्याधिकारी नीता अंधारे खड्डा असे नाव देण्यात आले.



यापुढे ७ ऑगस्ट २०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार बीड दौऱ्यावर येणार आहेत. धानोरा रोड आणि अंकुशनगर भागात पडलेल्या मोठ्या खड्ड्याचे नामकरण त्यांच्या हस्ते अजित दादा पवार खड्डा असे करण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने उपमुख्यमंत्र्यांचा दोन मिनिटांचा वेळ उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने विरोध नोंदवत त्यांना काळे झेंडे दाखवले जातील, असा इशारा वंचित बहुजन आघाडीकडून देण्यात आला आहे.

दरम्यान, ४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केवळ खड्डे बुजविण्याचे आदेश देण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. मात्र, धानोरा रोडवर तात्काळ हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात यावे, जेणेकरून स्थानिक व्यापारी, शालेय विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना होणारा त्रास टळेल, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

# प्रदेश उपाध्यक्षा अ‍ॅड.भाग्यश्री ढाकणे यांची कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

दि.०४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी भाजपा भटक्या जाती व विमुक्त जाती-जमातीच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा ड.भाग्यश्री ढाकणे (चेमटे) व ड.जगदीश ढाकणे यांनी, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास सदिच्छा भेट दिली असता ॲड.भाग्यश्री ढाकणे यांचा वाढदिवस असल्यामुळे विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी शॉल,श्रीफळ व बुके देऊन जन्मदिनाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या व अभिष्टचिंतन केले. तसेच ॲड.जगदीश ढाकणे यांचे ही स्वागत करण्यात आले.

त्यानंतर ड.भाग्यश्रीने मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, 'मी ! कालिकादेवी विद्यालयाची विद्यार्थीनी आहे. माझ्या जडणघडणीला येथूनच प्रारंभ झाला. म्हणून मला माझ्या शाळेचा सार्थ अभिमान आहे.आज कालिकादेवी विद्यालयाचा उतरोत्तर लौकीक वाढत चालला आहे. हे परिवर्तन पाहून मला खूप आनंद झाला. अलिकडे तर 'कालिकादेवी गुणवत्ता पॅटर्न, स्क्रिनिंग टेस्ट, गुणवंतांचा सन्मान, सांस्कृतिक उपक्रमांची कार्यशाळा, विद्यार्थ्यांसी मुक्त संवाद आणि कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वांचा ड्रेसकोड', पाहून ही एक नवी नांदीच वाटली अशी भावना यावेळी व्यक्त केली.



त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेबांनी शुभेच्छा देतांना सांगितले की, ॲड.भाग्यश्री यांनी महिला प्रदेश उपाध्यक्षा पदाच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, उपेक्षित, वंचित, भटके जाती-जमातीसाठी हाती घेतलेले कार्य उल्लेखनीय आहे. असे सांगून त्यांचे मनस्वी कौतुक केले. तर प्रा.डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी ॲड.भाग्यश्री ढाकणे यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा आलेख सांगितला. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, मा.जयदत्त (अण्णा) साहेबांचे स्वीय सहाय्यक मा.परमेश्वर धारकर प्रा.महारूद्र डोंगरे, प्रा.नामदेव तरकसे, प्रा.संजय काकडे, प्रा.अनिल जरे, प्रा.विनोद गलांडे, प्रा.महादेव हांगे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.नारायण तांबे, डॉ.अशोक घोडके, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.सुनिल मोरे, डॉ.सत्यनारायण ढवळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे इत्यादी प्राध्यापक, शिक्षकांची विशेष उपस्थिती होती.

# बीड शहरात रस्त्याच्या मधोमध असणारे रोहित्र म्हणजे विद्युत बॉम्बच

## महावितरण आणि नगरपरीषद यांची टोलवाटोलवी तर लोकप्रतिनिधींच्या डोळ्यावर झापडं; जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का?

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील चौकाचौकात आणि रस्त्याच्या कडेला असणारी रोहित्रे हि एखाद्या विद्युत बॉम्ब प्रमाणेच उभी असुन कधी या रोहित्राचा स्फोट होईल सांगता येत नाही. धोकादायक रोहीत्रे किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त उंचीवर असणे बंधनकारक असताना ३ते ४ फुट उंचीवर असणाऱ्या रोहित्रांमुळे बीडकरांचा जीव धोक्यात आहे. रोहित्राचा स्फोट होऊन त्यातुन उडालेल्या तेलामुळे रस्त्याने जाणारी मुले भाजल्याच्या घटना घडलेल्या आहेत. महावितरणच्या रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या धोकादायक डिपी हटविण्यात यावी अशी नागरीकांनी नगर परिषद आणि महावितरणला वारंवार मागणी करूनही प्रशासनाला याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते. नगरपरीषद महावितरणकडे तर महावितरण नगरपरीषदेकडे बोट दाखवून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करत आहे. लोकप्रतिनिधींनी डोळ्यावर झापड बांधल्याने त्यांना याचे गांभीर्य दिसून येत नसल्याने एकंदरीतच एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

**डीपीमध्ये आग लागल्याने स्फोट होऊन शाळकरी मुलांना गंभीर धोका होण्याची शक्यता पण प्रशासनाला गांभीर्य नाही : उत्तमराव मिसाळ**

कॅनॉल रोड ते तुळजापूर मध्ये अनेक यशवंतराव विद्यालय, शिवाजी विद्यालय तसेच विविध खाजगी कोचिंग क्लासेस, वसतिगृह या परीसरात आहेत. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीकांची वर्दळ असणाऱ्या या परीसरात महावितरणची विद्युत डीपी रस्त्याच्या मधोमध आहे.रस्त्यावरून ये जा करणाऱ्या शाळकरी मुलांना याचा धोका आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करते असा आरोप येथील रहिवासी उत्तमराव मिसाळ यांनी केला आहे.

**एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? : डॉ.गणेश ढवळे**

बीड शहरात गेल्या २ वर्षात अनेक ठिकाणी शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेंतर्गत जवळपास १४० कोटी रुपयांच्या



सिमेंट क्रांकीट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली. मात्र रस्त्याच्या मध्यभागी व कडेला असलेली उघडी व जमिनीलगत असणारे रोहित्रे आणि पोल हटविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व विद्युतखांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही. काही ठिकाणी वीज रोहित्र ऐन वर्दळीच्या ठिकाणी आणि बाजारपेठेतच आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने आर्थिंग मधुन करंट, उघड्या तारा, फ्युजची उघडी पेटी धोक्याचे कारण ठरण्याची शक्यता आहे. सुचना फलक, रक्षक संरचना किंवा सुरक्षा नसल्याने गंभीर अपघाताची शक्यता आहे. यासंदर्भात तक्रारी, निवेदने आणि आंदोलनानंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

**शहरातील धोकादायक रोहित्रे**

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, तुळजाई चौक, राजीव गांधी चौक, बार्शी नाका, केएसके महाविद्यालय परीसर, बालेपीर, माने काम्प्लेक्स रोड, सुभाष रोड, जालना रोड, जुने एसपी कार्यालय, कंकालेश्वर मंदिर, अण्णाभाऊ साठे चौक, अहिल्यादेवी होळकर पुतळा, बलभीम महाविद्यालय, पंचशील नगर, शाहुनगर, मोमीनपुरा आदी ठिकाणी उघडे रोहित्र आणि त्यात उघडे फ्युज बाक्स, वीज वाहिनी उपकरणे धोकादायक स्थितीत आहेत.

**महावितरण आणि नगरपरीषद यांची टोलवाटोलवी, जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न**

रस्ता रुंदीकरण करताना रोहित्रे व ईतर विद्युत उपकरणांचे स्थलांतर हे नगरपालिका व बांधकाम विभागाचे काम असल्याचे तर उघड्यावरील उपकरणांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येईल असे प्रेमसिंग राजपुत्र अधिक्षक अभियंता महावितरण बीड परीमंडळ स्पष्टीकरण देतात. तर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी आंदोलन अनुषंगाने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना दिलेल्या लेखी पत्रात शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले रोहित्र व विद्युत पोल महावितरणच्या मालकीचे असल्यामुळे ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवुन नगरपरिषदेला सहकार्य करावे अशा आशयाचे पत्र अधिक्षक अभियंता महावितरण यांना दिले आहे. एकंदरीतच महावितरण आणि नगरपरीषदेच्या भोंगळ कारभार नागरीकांच्या मुळावर आला आहे.



## श्रावण सोमवार निमित्त ना. पंकजा मुंडेंनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पंचम ज्योर्तिलिंग प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. श्रावण महिन्यातील आज दुसरा सोमवार होता, यानिमित्ताने ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी प्रभू वैद्यनाथ मंदिरात जाऊन विधीवत पूजा, अभिषेक करून दर्शन घेतले. मंदिरात आल्यानंतर देवल कमिटीच्या वतीने राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

शिरूर अनंतपाळ मठ संस्थानचे श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे श्रावण मासानिमित्त वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्री २१ दिवसीय मौन तपोनुष्ठान सुरू आहे. बेलवाडीतील गुरूलिंग स्वामी मंदिरात जाऊन या तपोनुष्ठानला ना. पंकजाताईंनी भेट देऊन महाराजांचे आशीर्वाद घेतले. यावेळी वीरशैव समाजाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजपच्या मंडळ शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, सुरेखा मेनकुदळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## लिप्ट देण्याचा बहाणा केला; अन् डोळ्यात चटणी टाकून साडेसहा लाखांचा ऐवज लंपास केला!

### आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील हरिनारायण आष्टा-जामगांव रोडवरील घटना

**आष्टी । प्रतिनिधी**

ओळखीतील व्यक्तीने लिप्ट मागण्यासाठी हात केल्याने थांबलेल्या कार चालकांच्या डोळ्यात चटणी टाकून बळजबरीने रोख रकमेसह दोन मोबाईल असा साडेसहा लाख रूपयांचा ऐवज काढुन घेतल्याची घटना रविवारी सायंकाळच्या दरम्यान आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील हरिनारायण आष्टा-जामगांव रोडवर घडली. या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील हरिनारायण आष्टा येथील मेडिकल चालक आदेश नवनाथ भवर हा रविवारी सायंकाळच्या दरम्यान स्वीप्ट कार क्रमांक एम.एच.१६ सी.व्ही.६३२३ हिने हरिनारायण आष्टा-जामगांव रोडने जात असताना ओळखीतील पती, पत्नीने हात केल्याने थांबला, तेवढ्यात त्याच्या पत्नीने खाली उतरण्याचे सांगताच पतीने कार चालकांच्या डोळ्यात चटणी टाकली आणि बाजूला असलेल्या अन्य दोघांनी येऊन तु उठू नकोस असे म्हणत असतानाच एकाने कारच्या समोरील सीटवर ठेवलेले ६ लाख रूपये रोख, एक ४० हजारांचा आयफोन व विवो कंपनीचा १० हजारांचा मोबाईल असे एकुण ६ लाख ५० हजार रूपयांचा ऐवज बळजबरीने काढुन घेतल्याची घटना घडली.

याप्रकरणी आदेश नवनाथ भवर यांच्या फिर्यादीवरून ४ ऑगस्ट रोजी आष्टी पोलिस ठाण्यात आरोपी चिमण्या मैदान भोसले, त्याची पत्नी नाव माहीत नाही, व अन्य दोन अनोळखी अश्या चार जणांविरूध्द कलम ११९(१), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक एन.बी.सुर्यवंशी करीत आहेत.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पार्टीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश

**केज । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या पार्टीमध्ये दि.०४ ऑगस्ट रोजी



वंचित बहुजन आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्यांचा केज येथे जाहीर प्रवेश झाला असून यामुळे आर पी आय च्या आठवले गटाची टाकत वाढली आहे.

केंद्रीयमंत्री रामदासजी आठवले यांच्यावर विश्वास ठेऊन व संदीपान (तात्या) हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली व केज तालुका अध्यक्ष सुनिल हिरवे यांच्या हस्ते वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश बचूटे यांचा असंख्य कार्यकार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) मराठा आघाडीचे महादेव ढवारे, तालुका उपाध्यक्ष मा.नगर अध्यक्ष वेंकट हजारे, देवानंदजी वाघमारे, मिलिंद गायकवाड, अमोल मस्के वंचितचे -सुनील जोगदंड, शहाजी जोगदंड, प्रकाश जोगदंड, जयसिंग जोगदंड, विष्णू जोगदंड, राहुल जोगदंड, उत्तम वाघमारे विकास गायकवाड असंख्ये कार्य कर्त्यांनी रामदासजी आठवले यांच्या आदेशानुसार व संदीपान (तात्या) हजारे व केज तालुका अध्यक्ष सुनीलजी हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा जाहीर प्रवेश करण्यात आला.

## जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामास उच्च न्यायालयाची मंजुरी

**केज । प्रतिनिधी**

केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यास उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजुरी दिली असून, सदर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता प्रक्रियेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांच्या आदेशानुसार बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.




उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित इमारतीत पुढील सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे. तृतीयपंथीय व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे तसेच दिव्यांग, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी न्यायालयीन इमारतीत प्रवेशयोग्य पायाभूत सुविधा असल्या पाहिजेत. सदर प्रस्ताव उच्च न्यायालयाचे पत्र दि.२९ नोव्हेंबर २०२४ व दि.२१ डिसेंबर २०२४ नुसार तयार करण्यात आला आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंबाजोगाई कार्यालया मार्फत तांत्रिक मान्यते साठी आवश्यक बाबींचा समावेश करून अंतिम अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे केज तालुक्यातील न्यायिक कामकाज अधिक सुसज्ज आणि सर्वसमावेशक पद्धतीने पार पाडले जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एम.एस.लाड यांच्या सह वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी याची मागणी केली होती त्यांच्या मागणीची दखल घेऊन उच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे. याबद्दल केज वकील संघाच्या वतीने उच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा तात्काळ निधी द्या!

### राखीव प्रभागातील विकासकामासाठी माजी नगरसेवक १५ ऑगस्ट पासून बेमुदत धरणे आंदोलन करणार

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनु. जातीच्या लोकसंख्येनुसासार जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विविध विकास कामे केली जातात यासाठी दर वर्षी जानेवारी महिन्यात जिल्हा नियोजन समितीची बैठक घेऊन निधी ची तरतूद करत नगर परिषदेस प्रस्ताव सादर करण्या बाबत पत्र दिले जाते. परंतु २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा कालावधी लोटला असून संपूर्ण जुलै महिना लोटला तरी देखील अद्यापपर्यंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी तसेच संबंधित योजनेचे तरतुदी, प्रस्ताव सादर करणे बाबत चे पत्र, मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांना आपल्या मार्फत देण्यात आलेले नाही त्यामुळे बीड शहरातील अनुसूचित




जाती राखीव प्रभागातील विकासात्मक कामे खोळंबले असून त्यावर दुष्काळाचे सावट पसरले आहे.

सध्या नगर परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून निवडणूक आयोगामार्फत कधीही निवडणुकीची घोषणा होऊन आदर्श आचारसंहिता लागू होऊ शकते असे झाल्यास अनुसूचित जातीच्या समाज बांधवांवर तसेच राखीव प्रभागावर अन्याय होऊन अनुसूचित जातीच्या वस्त्या विकासापासून वंचित राहू शकतात त्यामुळे अनुसूचित जाती राखीव प्रभागाच्या सर्वांगीन विकासासाठी नगर परिषद निवडणूकीच्या आचारसंहितेपूर्वी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर निधीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांना आदेशित करुन किंबहुना तसे पत्र देऊन प्रस्तावित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत जिल्हा प्रशासनास सूचित करून अनुसूचित जाती प्रभागातील विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावे अन्यथा सदरील मागणीसाठी लोकशाही मार्गाने दि. १५ ऑगस्ट २०२५ पासून लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनातून जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, माजी नगरसेविका सौ.पुजा गणेश वाघमारे, सौ.रत्नमाला बाबुराव दुधाळ, सौ.मिना बिबिशन लांडगेसह आदींनी दिला आहे.

## क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार मला मिळालेल्या राष्ट्रीय युवा पुरस्कारापेक्षाही मोठा वाटतो : आ.अमित गोरखे

### आमदार अमित गोरखे यांना यंदाचा लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार बालगंधर्व येथे प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

क्रांतिवीर लहुजी वस्ताद प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित हिंदू मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ उत्साही वातावरणात बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे संपन्न झाला. मागासवर्गीय समाजातील १० वी व १२ वी उत्तीर्ण होत असताना उच्च गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच सामाजिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते १० वी व १२ वीमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व गौरवपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले. प्रतिवर्षी मागासवर्गीय समाजातील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना दिला जाणारा क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार यंदा पिंपरी-चिंचवडचे




युवा आमदार अमित गोरखे यांना प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराची स्थापना मागासवर्गीय समाजात सामाजिक परिवर्तन आणि शैक्षणिक जागृतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्हे, शाल, श्रीफळ तसेच लहुजी वस्ताद साळवे यांनी त्यांच्या जीवनात वापरलेल्या चांदीच्या कड्याच्या प्रतीकात्मक रूपात प्रत्यक्ष चांदीचा कडा देण्यात आला. हा कडा केवळ एक स्मृतिचिन्ह नसून लहुजी वस्ताद यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनाचा साक्षात्कार घडवणारे प्रतीक आहे.

या वर्षीचा पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुधाकर जाधवर, मिलिंद एकबोटे यांच्या शुभहस्ते आ.अमित गोरखे यांना प्रदान करण्यात आला. त्यांचे सामाजिक न्याय, शैक्षणिक प्रोत्साहन, मागासवर्गीय समाजासाठी विधीमंडळात केलेले भरीव कार्य आणि तरुण नेतृत्वातून घडवलेले सामाजिक भान याची प्रचिती म्हणून त्यांची निवड करण्यात आली. यावेळी आमदार अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. तुम्ही केवळ गुणांनी यशस्वी होता तेवढंच नाही, तर तुमच्यामुळे समाजालाही उभारी मिळते. आजचा हा सन्मान तुम्हाला पुढील शिक्षणासाठी प्रेरणा देणारा ठरेल. शिक्षण हीच खरी क्रांती आहे. कार्यक्रमात डॉ. सुधाकर जाधवर, समीर कुलकर्णी, मिलिंद एकबोटे, योगेश ठिपसे, किसनराव जाधव, यशस्वी उद्योजक योगेश देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.



### महावितरण विभाग केजच्या बिल वसुलीचा आदर्श

## केज ग्रामीण विभाग ०२ ची ९२ टक्के विजयी वसुली अधिकारी कर्मचाऱ्यांचे केले कौतुक

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या केज ग्रामीण पथक ०२ यांच्याकडे जुलै २०२५ साठी विज बिल वसुली चे ३२ लाखांचे उद्दिष्ट होते. अथक प्रयत्नांमुळे विभागाने २९ लाख रुपये विज बिल वसूल करून ९२ टक्के वसुली चा टप्पा गाठला आहे.

या उल्लेखनीय यशाचे श्रेय उप कार्यकारी अभियंता सय्यद मिनाजोदीन यांच्या प्रभावी मार्गदर्शनाला जात आहे तसेच सहाय्यक अभियंता बोराटे यांनी उत्कृष्ट नियोजन करत हे उद्दिष्ट जवळपास गाठले. यशस्वी वसुली मध्ये योगदान देणारे कर्मचारी गोपाळ मुंडे, आदिनाथ मुंडे, गजानन पांचाळ, संतोष कराड, प्रवीण सांगळे, राम सोळंके, अशोक वैरागे, राजाभाऊ राठोड, सतीष तांदळे या सर्वांनी संघ भावनेने मेहनत घेतली. उप कार्यकारी अभियंता सय्यद व मुख्य तंत्रज्ञ विष्णु तेलंग यांनी सर्व टीमचे अभिनंदन करत त्यांच्या प्रयत्नांना सलाम केला आहे. विज बिल वसुलीत केज ग्रामीण-२ हे आदर्श ठरले असल्याने अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यांच्या सेवेत महसूल विभाग सदैव तत्पर : स्मिता गुंजाळ-शेळके

### पारगाव शिरस मंडळ विभागातील महसूल सप्ताह उत्साहात साजरा; शेतकऱ्यांमध्ये समाधान

**बीड । प्रतिनिधी**

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान राज्यभरात महसूल विभागाचा 'महसूल सप्ताह' उत्साहात साजरा होत आहे. या सप्ताहाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील पारगाव शिरस मंडळ विभागात दिनांक ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. हे शिबिर मौजे साक्षाळपिंपरी येथे मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचे आदेश तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम पार पडला. या शिबिरात पारगाव शिरस मंडळातील १३ गावांचा एकत्रित सहभाग होता. यात पारगाव शिरस, तांदळवाडी भिल्ल, शहाबाजपूर, साक्षाळपिंपरी, बहादरपूर, सोनगाव, केतुरा, रुद्रापूर, कुमशी, सौंदाना, खापरपांगरी,




उमरद जहागीर व पिंपरगव्हाण या गावांचा समावेश आहे.

महसूल विभागाची आपल्या दारी संकल्पना या शिबिराचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान व कार्यक्षम बनवणे. प्रशासन आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि योजनांशी संबंधित समस्या थेट गावातच मार्गी लावण्यावर भर देण्यात आला. शिबिराची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधताना मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ शेळके यांनी ई पीक पाहणी ४.०.० संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की खरीप हंगामासाठी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे स्वतःच बांधावर जाऊन पीक पाहणी नोंद करावी.

फार्मर आयडीचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी आवाहन केले की, अजूनही ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घेतले नाही, त्यांनी तो त्वरित काढावा, कारण अनेक कृषी व शासकीय योजनांसाठी याची आवश्यकता भासते. योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वितरण या शिबिरात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना व राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वितरित करण्यात आले. त्यासोबतच विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.

गौरव व सत्कार याच कार्यक्रमात बीड उपविभागातून 'आदर्श ग्राम महसूल अधिकारी' म्हणून साक्षाळपिंपरी येथील ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांना नुकतेच १ ऑगस्ट रोजी सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्त महसूल मंडळ आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन व उपस्थिती या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर, यशवंत सानप, उत्तरेश्वर खांडे, ज्योती आडागळे, स्वाती घुगे यांचे विशेष योगदान होते.

या कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साक्षाळपिंपरीचे ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच सौरभ नलावडे, अंकुश काशीद, परशुराम काशीद, शंकर काशीद, शहादेव सदाफुले, आदिनाथ क्षीरसागर, सुनिल काशीद, ज्ञानेश्वर काशीद, दत्तात्रय काशीद, सविता पवार, केतुरा चे सरपंच मयूर तळेकर, पारगाव शिरस चे सरपंच दिनकर जमदाडे, रामकिसन वाटमोडे, उमरद जहागीरचे सरपंच दादासाहेब शेळके तसेच सौंदाना येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू गायके यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. हा उपक्रम म्हणजे महसूल विभागाची गावकऱ्यांप्रती असलेली कळकळ आणि सेवा-भावना यांचे जिवंत उदाहरण आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT